सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्र. १०१९(१)/२०२०/१४-ब दिनांक :- १९ मे २०२१

# घोषणा

विषय :- खेळाडू प्रवर्गातून आरक्षणाचा दावा केलेल्या उमेदवारांनी त्यांच्या दाव्याच्या पृष्ट्यर्थ विहीत कागदपत्रे सादर करणेबाबत

संदर्भ:- आयोगाची दि.२९ जानेवारी २०२१ रोजीची घोषणा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत उपरोक्त संदर्भांकित दि.२९ जानेवारी २०२१ रोजीच्या घोषणेन्वये सहायक मोटार वाहन निरीक्षक (पूर्व ) परीक्षा २०२० करीता खेळाडू आरक्षणाचा दावा केलेल्या उमेदवारांनी संबंधित उमेदवार वास्तव्यास असलेल्या विभागातील सक्षम क्रीडा प्राधिकरणाने निर्गमित केलेला क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवाल अथवा सक्षम क्रीडा प्राधिकरणांकडे क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीकरीता केलेल्या अर्जाची पोचपावती यापैकी लागू असेल , त्या कागदपत्रांच्या स्कॅन प्रती पुरावा म्हणून दिनांक १६ फेब्रुवारी २०२१ पर्यंत सादर करण्यासंदर्भात सर्व उमेदवांराना कळविण्यात आले होते तथापि अद्यापपर्यंत काही उमेदवारांनी त्यांचे वैध प्रमाणपत्र /पडताळणी अहवाल आयोगाकडे सादर केलेले नाहीत. संबंधित ज्या उमेदवारांनी त्यांची कागदपत्रे सादर केलेली नाहीत त्यांनी त्यांची वैध क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवाल किंवा सक्षम प्राधिकरणाकडे केलेल्या अर्जाची पोचपावती यांची स्कॅन प्रत examination-2@mpsc.gov.in या ईमेल आयडीवर दिनांक ३० मे २०२१ पर्यंत सादर करणे अनिवार्य आहे. त्यानंतर प्राप्त झालेल्या प्रमाणपत्राचा विचार करण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

उपसचिव, परीक्षा-२
महाराष्ट्र लोकसेवा आयोग